# बृहन्मुंबई महानगरपालिका

सार्वजनिक आरोग्य खाते

कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन

दिनांक.१०.०५.२०२३ रोजी प्रसारित करण्यात आलेल्या 'साहयकारी परिचारीका (प्रसविका)' संवर्गातील तात्पुरत्या गुणवत्ता यादीमध्ये खालील उमेदवाराचा समावेश करण्यात येत आहे.सदर उमेदवाराने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous या संकेतस्थळावर यापुर्वी प्रसारित केलेल्या सुचनांनुसार नावासमोर नमुद केलेल्या दिनांकास कागदपत्रांच्या मुळ पडताळणीकरीता उपस्थित रहावे.

| उमेदवाराचे नाव | अंतिम टक्केवारी (सरासरी) | समांतर आरक्षणाचा प्रकार | उमेदवार कोणत्या सामाजिक आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छितो | मूळ कागदपत्रांच्या पडताळणीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| श्रीम.वाकोडे दिक्षा अजाबराव | 73.00 | अनाथ | अजा | २६.०५.२०२३ |

सही/-

(डॉ.मंगला गोमारे)

कार्यकारी आरोग्य अधिकारी

# बृहन्मुंबई महानगरपालिका

सार्वजनिक आरोग्य खाते

कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन विभाग

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील रु.25500-81100/- या वेतनश्रेणीतील `साह्यकारी परिचारिका (प्रसविका)' या संवर्गातील 421 पदे भरण्यासाठी दि.16.01.2023 ते दि.25.01.2023 पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. त्याअनुषंगाने या विभागास प्राप्त झालेल्या तसेच कागदपत्रांच्या प्राथमिक छाननीमधील उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची **तात्पुरती यादी** मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीकरिता प्रसारित करण्यात येत आहे.

सदर तात्पुरत्या यादीमध्ये ज्या उमेदवारांची नावे नमूद करण्यात आली आहेत त्यांनी वेळापत्रकानुसार **मुंबई पब्लिक स्कूल, भातणकर मार्ग, परेल**, **मुंबई** - 400012 येथे सोबत जोडण्यात आलेल्या यादीमधील सर्व मूळ प्रमाणपत्रांसह पडताळणीकरिता उपस्थित रहावे. सोबतच्या यादीमध्ये नमूद करण्यात आलेली सर्व **मुळ प्रमाणपत्रे सादर करु न शकणाऱ्या उमेदवारास कोणतीही पुर्वसूचना न देता अपात्र ठरविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

उमेदवारांसाठी सूचना -

1. मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसाठी उमेदवारांनी सादर केलेल्या अर्जाची छायांकित प्रत तसेच मूळ जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व आवश्यक कागदपत्रांच्या मूळ व साक्षांकित छायांकित प्रती सोबत घेऊन उपस्थित रहावे.
2. या पदाची संपूर्ण जाहिरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचून त्याअनुषंगाने आवश्यक कागदपत्रे उमेदवारांनी सोबत आणावी.
3. उमेदवारांना मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसाठी नेमून दिलेल्या स्थळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
4. उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे वेळापत्रकातील दिनांकास कार्यालयास पडताळणीसाठी सादर न केल यास त्यांना अपात्र ठरवून निवडप्रक्रियेतून बाद करण्यात येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची असेल, याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणी नंतर केलेला कोणताही पत्रव्यवहार गृहीत धरला जाणार नाही.
5. सदर तात्पुरती यादी केवळ उमेदवारांच्या मूळ कागदत्रांच्या पडताळणीसाठी प्रसिद्ध करण्यात येत असून सदर यादी अंतिम गुणवत्ता यादी नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. यास्तव, या तात्पुरत्या यादीच्या आधारे उमेदवारास साह्यकारी परिचारिका (प्रसविका) पदावर नियुक्तीचा हक्क असणार नाही.
6. तात्पुरत्या यादीमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केल्यानंतर पात्र उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्याअनुषंगाने उमेदवारांनी वेळोवळी संकेतस्थळावर भेट द्यावी.

सही/-

(डॉ.मंगला गोमारे)

कार्यकारी आरोग्य अधिकारी

# बृहन्मुंबई महानगरपालिका

सार्वजनिक आरोग्य खाते

कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन

साह्यकारी परिचारिका (प्रसविका) पद भरती प्रक्रियेतील कागदपत्रांच्या पडताळणीकरिता खाली नमूद केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रमाणपत्रांसह साक्षांकित छायांकित प्रती आणणे आवश्यक आहे. मूळ प्रत सादर करु न शकणाऱ्या उमेदवारांस अपात्र ठरविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कागदपत्रांची यादी |
|---|---|
| ०१ | नावात बदल असल्यास (राजपत्र/विवाह प्रमाणपत्र) |
| ०२ | आधार कार्ड |
| ०३ | पॅन कार्ड |
| ०४ | जन्म दाखला |
| ०५ | शाळा सोडल्याचा दाखला |
| ०६ | वास्तव्याचा पुरावा /अधिवास प्रमाणपत्र/ शिधापत्रिका/ पासपोर्ट |
| ०७ | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियमित सेवेत असल्यास ओळखपत्राची प्रत |
| ०८ | दहावी गुणपत्रिका व प्रमाणपत्र |
| ०९ | बारावी गुणपत्रिका व प्रमाणपत्र |
| १० | सपप्र प्रथम वर्ष गुणपत्रिका (Clear copy of ANM 1st year Marklist)<br>अभ्यासक्रमाचे प्रथम वर्ष एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण असल्यास सर्व गुणपत्रिका सोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच त्याबाबतचे attempt certificate सोबत आणणे आवश्यक आहे. सर्व गुणपत्रिका स्पष्ट दर्शनीय असाव्यात. |
| ११ | सपप्र द्वितीय वर्ष गुणपत्रिका (Clear copy of ANM 2nd year Marklist)<br>अभ्यासक्रमाचे द्वितीय वर्ष एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण असल्यास सर्व गुणपत्रिका सोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच त्याबाबतचे attempt certificate सोबत आणणे आवश्यक आहे. सर्व गुणपत्रिका स्पष्ट दर्शनीय असाव्यात. |
| १२ | सपप्र पदविका प्रमाणपत्र (ANM Diploma Certificate) |
| १३ | महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र व नूतनीकरणाची पावती (ANM Registration certificate with renewal slip upto 30.03.2027) |
| १४ | संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र |
| १५ | जात प्रमाणपत्र |

| | |
|---|---|
| १६ | जात वैधता प्रमाणपत्र |
| १७ | अद्ययावत नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र |
| १८ | जाहीरातीमध्ये नमुद केल्याप्रमाणे समांतर आरक्षणाबाबतची प्रमाणपत्रे (दिव्यांग व्यक्ती/खेळाडू/प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त/माजी सैनिक/अंशकालिन पदवीधर उमेदवार/अनाथ) |
| १९ | सेवायोजन कार्यालयाचे प्रमाणपत्र |
| २० | शिक्षा/गुन्हा/न्यायालयीन प्रकरण असल्यास त्याबाबत कागदपत्रे |
| २१ | पूर्वीच्या नियोक्त्याचे नाहरकत प्रमाणपत्र |
| २२ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS) उमेदवारांचे पात्रता प्रमाणपत्र आर्थिक वर्ष २०२२-२३ |

सही/-
(डॉ.मंगला गोमारे)
कार्यकारी आरोग्य अधिकारी